**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी**
**मर्यादित अउदा प्रकल्प नि संवसु**
**परिमंडल, नागपूर**

## जाहिरात क्र. १/२०१७ अंतर्गत सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) पदावर नेमणूक करण्यासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची सुधारित निवड यादी

महाराष्ट्र राज्य विद्युत महापारेषण कंपनीच्या नागपूर परिमंडल कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०१/२०१७ अन्वये सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदांसाठी दि. २०.०८.२०१७ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेत (ऑनलाईन) उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे तसेच जाहिरातीत देण्यात आलेल्या सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) पदाची उपलब्ध संख्या व सामाजिक - समांतर आरक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन तात्पुरते पात्र ठरलेल्या उमेदवारांची सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाची तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी ही काही अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक १८.०९.२०१७ रोजीच्या सूचनापत्राद्वारे प्रकाशीत करण्यात आलेली होती.तसेच दि.१३.१२.२०१७ दि.२०.०३.२०१८ व दि.०७.०५.२०१८ रोजी सुधारीत यादी प्रकाशित करण्यात आली होती.

१. त्या अनुषंगाने, वरील प्रमाणे प्रसारीत केलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना लेखी परिक्षेतील गुणानुक्रमाणे प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणी करीता बोलावून त्यांच्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे. कागदपत्रे पडताळणीस काही उमेदवार उपस्थित न राहिल्यामुळे, तसेच काही उमेदवार जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे विहित अनुभवाची अट पूर्तता करत नसल्यामुळे,कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यामुळे व काही उमेदवारांनी नियुक्तीपत्रानुसार रुजु होण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे दिनांक १८.०९.२०१७, दिनांक १३.१२.२०१७, दिनांक २०.०३.२०१८ व दिनांक ०७.०५.२०१८ रोजीच्या सूचनापत्रातील अटी नुसार गुणांनुक्रमाने निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, मागास प्रवर्ग, उन्नत- प्रगत गटात मोडत नसणे, अधिवास प्रमाणपत्र ईत्यादी बाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येऊन तात्पुरती निवड/प्रतिक्षा यादी तयार करुन खालील प्रमाणे प्रसारीत करण्यात येत आहे.

२. केवळ सुधारित निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक मिळण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ही निवड यादी पुर्णतः जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीनराहून तयार करण्यात आली आहे.

३. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करित नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटींचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. जे उमेदवार जाहिरातीत नमुद केलेल्या दिनांकापर्यंत सदर पदाकरीता आवश्यक पात्रता धारण करीत नाहीत किंवा ज्या उमेदवारांनी आवश्यक पात्रता व कागदपत्रे धारण / प्राप्त केलेली नसतील व वैध नसतील अशा उमदेवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व सदर प्रकरणी कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल महापारेषण कंपनीतर्फे घेण्यात येणार नाही. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाच्या सुधारित निवड यादीतील उमेदवार हे निवड प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर अपात्र आढळून आल्यास सुधारित प्रतिक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येऊन त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादीतील उमेदवारसुध्दा पात्रता व कागदपत्रे पडताळणीत अपात्र ठरल्यास त्याखालील गुणवत्ताधारक उमेदवारांची स्वतंत्र निवड / प्रतिक्षा यादी लावण्याचे आधिकार महापारेषण कंपनी राखून ठेवत आहे.

**पृष्ठ क्र.२/-**

५. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाची सुधारित निवड यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रणदोषामूळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार महापारेषण कंपनीने राखून ठेवलेला आहे.

६. मुळ निवड / प्रतिक्षा यादी ही दि. १८.०९.२०१७ रोजी प्रकाशित करण्यात आलेली असल्यामुळे सुधारित निवड यादी दि. १८.०९.२०१७ पासुन १ वर्षाकरिता वैध राहील.

७. सर्वेक्षक श्रेणी-२ (Surveyor Grade-2) या पदाची सुधारित निवड / प्रतिक्षा यादी खालीलप्रमाणेः-

| Sr. No. | Roll No. | Name of the Candidate | Category | Remarks |
|---|---|---|---|---|
| | | Select List | | |
| 01 | 1901040034 | DURGAPRASAD BACHHAPRASAD KAMKAR | NT-B | Selected Against OPEN |
| 02 | 1901010020 | SANDEEP RAMESH INGLE | SC | Selected Against OPEN |
| 03 | 1501010001 | GAUTAM ABHIMANYU MOHOD | SC | |
| 04 | 1401020005 | MANOJ BHIVDAS THAKARE | ST | |
| 05 | 2001050018 | SANTOSH RUSTUMRAO MASKE | NT-C | |

८. वरील सुधारीत निवड यादीतील उमेदवार अनुक्रमांक १ व ४ यांची जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे अर्हता सिध्द झाल्याने त्यांना नियुक्ती पत्र देण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात आलेली आहे.

स्वा./-
मुख्य अभियंता
अउदा प्रकल्प तथा संवसु परिमंडल, नागपूर

दिनांकः- १२.०७.२०१८

*************